**कृपया प्रसिध्दीसाठी** **13 फेब्रुवारी 2009**

## रेल्वे मंत्र्यांची यंदाही मुंबईकरांना सापत्न वागणूक : राम नाईक

**मुंबई, शुक्रवार** : "रेल्वे मंत्री श्री. लालू प्रसाद यांनी त्यांचे शेवटचे रेल्वे बजेट सादर करतानाही लक्षावधी मुंबईकरांना सापत्न वागणूक देण्याची आपली प्रथा कायम ठेवली. देशातील एकूण 1.2 कोटी दैनंदिन रेल्वे प्रवाशांपैकी मुंबईच्या 65 लाख प्रवाशांसह दिल्ली, चेन्नईच्या उपनगरी प्रवाशांचा साधा उल्लेखही रेल्वे मंत्र्यांनी आपल्या भाषणात केला नाही," अशी टीका माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी केली आहे.

अंतरिम रेल्वे बजेटबद्दल आपली प्रतिक्रिया देताना श्री. राम नाईक म्हणाले,"इतर सर्व वर्गांच्या प्रवासी भाड्यात 2 टक्के घट करणा-या रेल्वे मंत्र्यांनी यंदाही उपनगरी भाड्यात कोणतीही सवलत न दिल्याने उपनगरी प्रवाशांच्या संतापात भर पडली आहे. गेल्या वर्षी रु. 5,300 कोटींच्या एमयुटीपी - II चे लालूच दाखविणा-या रेल्वे मंत्र्यांनी त्याची सद्यस्थिती काय आहे तसेच रु. 4,500 कोटींचा एमयुटीपी -I ही अद्याप का पूर्ण होऊ शकला नाही यावर भाष्य करणे टाळले हेही मुंबईकरांचे दुर्दैवच."

अंतरिम अर्थ संकल्पात कोणतीही नवी घोषणा करणे घटना व संसदीय संकेतांना धरुन नसते. तरीही रेल्वे मंत्री श्री. लालू प्रसाद यांनी नव्या गाड्यांची, नव्या विस्तारीत गाड्यांची व दोन नव्या रेल्वे विभागांची घोषणा केली. आता याबाबत लोकसभा अध्यक्ष योग्य भूमिका घेतील अशी अपेक्षाही श्री. नाईक यांनी व्यक्त केली आहे.

**(कार्यालय सचिव)**